FORM-1A N.C.R.B.

I.I.F.-I

पहिली खबर

# FIRST INFORMATION REPORT

0154148

फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम १५४ अन्वये ( Under Section 154 Cr. P.C.)

1. राज्य State महाराष्ट्र, जिल्हा District मुंबई, पोलीस ठाणे Police Station ला.प्र.वि.,मुं., पहिली खबर क्र. FIR No. ४० , वर्ष Year २०२१, दिनांक Date ०१/१०/२०२१
2. (i) अधिनियम Act भ्रष्टाचार प्रतिबंधक कायदा 1988, कलमे Sections ७
   (ii) अधिनियम Act —, कलमे Sections —
   (iii) इतर अधिनियम व कलमे Other Acts and Sections
3. (a) अपराधाची घटना : वार Occurrence of offence : Day शुक्रवार, तारीख पासून Date from ३०/९/२०२१ वेळ Time १०:००, तारीख पर्यंत Date to ~~३०/०९/२१~~ ०१/१०/२०२१ वेळ Time ०३:४०
   वेळेचा अवधी (प्रहर) (योग्य ठिकाणी ✓ अशी खुण करा) (Tick applicable portion).
   (1) 00.00 ते 03.00 (2) 03.00 ते 06.00 (3) 06.00 ते 09.00 (4) 09.00 ते 12.00 (5) 12.00 ते 15.00
   (6) 15.00 ते 18.00 (7) 18.00 ते 21.00 (8) 21.00 ते 24.00 (9) 06.00 ते 18.00 (5) 18.00 ते 06.00
   (b) पो. ठा. ला माहिती मिळाल्याची Information received at P. S. तारीख Date ३०/०९/२०२१, वेळ Time १०:००
   (c) गुन्हा दाखल झालेचा सर्वसाधारण स्टेशन डायरीचा नोंद क्र. General Diary Reference : Entry No. ०१, तारीख Date १/१०/२०२१ वेळ Time ०३:४०
4. माहितीचा प्रकार Type of Information : प्रत्यक्ष, लेखी / तोंडी Written / Oral लेखी
5. गुन्हा घडल्याचे ठिकाण (a) पोलीस ठाण्यापासून अंतर व दिशा Place of Occurrence : (a) Direction and distance from P. S. —, चौकी / बीट / दुरक्षेत्र नाव व क्र. Chouki / Beat / O.P. Name and No.
   (b) गुन्हा घडल्याचे ठिकाणाचे नाव Address of Occurrence Name स्वरूप बार चे शेजारी, शेल देवूल शकत जवळ, पी.डी. टॅंक रोड, ठिकाणाचे नंबर No. if any, गल्ली Ward, रस्त्याचे नाव Name of road
   जवळचे ओळख चिन्ह / ठिकाण Nearest identifiable place, गाव Village, पोस्ट Post, तालुका Taluka मुंबई, जिल्हा Dist. मुंबई, राज्य State महाराष्ट्र
   (c) पोलीस ठाणेचे हद्दीबाहेर असल्यास त्या पो.स्टे.चे नाव In case, outside the limit of this Police Station, तालुका Taluka, जिल्हा Dist., राज्य State
6. तक्रारदार / खबर देणाराचे नाव व पत्ता Complainant / Informant : Permanent Address.
   (a) नाव Name श्री अहमद चिप्पा (b) वडिलांचे / पतीचे नाव Father's / Husband's Name हसन चिप्पा
   (c) जन्म तारीख व वय Date of Birth and Age ४२ वर्षे (d) राष्ट्रीयत्व Nationality भारतीय फोन नं. Phone No. 8070553880
   (e) पारपत्र क्रमांक Passport No. —, दिल्याचा दिनांक Date of Issue —, दिल्याचे ठिकाण Place of Issue — (f) व्यवसाय Occupation पत्रकार/व्यवसाय
   (g) धर्म Religion मुस्लिम, जात Caste, जनजात Sub-Caste
   (h) पत्ता Address १०१, इस्माईल कर्टे रोड, वाहेद बिल्डींग रूम नं-५, गल्ली / सर्व्हे नं. Ward, घर / नाव नं. House/Name No., फोन / मो. नं. Phone/Mo. No. —, पॅन नं. PAN No., वोटर्स नं. Card No.
   रस्त्याचे नाव Road पायधुनी, मुंबई-०, जवळचे प्रसिद्ध ठिकाण Nearest identifiable place, गाव Village, पोस्ट Post, पो. स्टे. P. Stn. पायधुनी
   तालुका Taluka मुंबई, जिल्हा Dist. मुंबई, राज्य State महाराष्ट्र, सध्याचा पत्ता Present Address
7. माहिती असलेल्या आरोपीचे संपूर्ण नाव व पत्ता (आवश्यक असल्यास स्वतंत्र कागद जोडावा.) (संशयिताचे वर्णन प्र. ख. रिपोर्टच्या फॉर्म 1-B वर वेगळ्या शिटवर घेऊन तपासिक अंमलदाराच्या प्रथम खबरीला व सं. अभियोक्ता यांच्या फाईलला जोडावे.)
   Details Name and Address of known Accused (Attach separate sheet, if necessary.) (If suspect particular of physical feature write on form 1-B of attach FIR 1-B to Case Diary.)

   कृष्णा मारुती पवार, वय ५१ वर्षे, धंदा-नोकरी (इमारत मुकादम, बृहन्मुंबई म.पा., सी वार्ड, मुंबई. रा. ठि- बिल्डिंग-८, रूम नं-७०२, म्हाडा कॉलनी, प्रतिक्षा नगर, सायन कोळीवाडा, मुंबई-४०००२२.

Y.P.P.-800 Reg.-(25×6=150 Lvs.)-2-2018-PA3-(K) 829

## फिर्याद

दिनांक – ०१/१०/२०२१.

मी अहमद हसन चिणा, वय ४२ वर्षे, धंदा – व्यवसाय/पत्रकार, रा.ठी. १०१, इस्माईल कर्ते रोड, वाहीद बिल्डींग, रूम नं. ५, पायधुनी, मुंबई मो.क्र. ८०७०५५८८८०.

---

मी वरीलप्रमाणे असून वर नमुद पत्त्यावर मी माझे कुटुंबासह राहावयास असुन माझा इमिटेशन ज्वेलरीचा मार्केटींगचा व्यवसाय करतो व त्यातुन मिळणाऱ्या उत्पन्नातुन माझे कुटुंबाचा उदरनिर्वाह चालतो.

मी राहत असलेल्या परिसरात बिल्डींग नं. ९०– ९२, इस्माईल कर्टे रोड, धोगरी मोहल्ला, मुंबई – ४००००३ येथे आमचे जमातीची जागा असुन, त्याचे देखभाल करण्याचे काम,श्री इजाज अहमद हे पाहत होते. ते एक महिन्यापुर्वी गावी गेले असल्याने सदर जमातीचे देखभालीचे काम मी पाहात आहे. सदर जमातीची इमारतीचे बांधकाम दोन मजली केलेले आहे. त्याचे टेरेसवर पावसापासुन संरक्षण मिळावे म्हणुन पत्र्याचे शेड बांधण्यात आलेले आहे.

दिनांक २३/०९/२०२१ रोजी बीएमसी सी वार्डमधील श्री पवार साहेब हे तेथे आले व त्यांनी मला सांगितले की, जमातीच्या बिल्डींगच्या टेरेसवरील पत्र्याचे शेड हे अनधिकृत असुन ते काढणेबाबत दिनांक १४/७/२०२१ रोजी ५५ एमआरटीपीची नोटीस जमातीच्या बिल्डींगचे देखभाल पाहणारे श्री एजाज अहमद यांना देण्यात आली आहे. त्याची स्पिकींग नोटीस दयावयाची आहे. त्यावेळी मी त्यांना सांगितले की, श्री एजाज अहमद हे गावी गेले असुन सध्या जमातीच्या इमारतीचे देखभाल मी पाहात आहे. त्यावर त्यांनी मला स्पिकींग ऑर्डर नोटीस देवुन त्यावर माझी स्विकृतीची सही घेतली व सदरची नोटीस मला दिली.

त्यावर मी त्यांना सांगितले की, सदरचे पत्र्याचे शेड हे पावसापाण्यापासुन संरक्षण मिळावे म्हणुन केलेले आहे. ते तात्पुरते स्वरूपाचे आहे ते नंतर आम्ही काढुन घेवु. परतु श्री पवार साहेब यांनी सांगितले की, सदरची कारवाई करायची नसल्यास मला ५०,०००/– दयावे लागतील नाहीतर आठ दिवसानंतर आम्ही बांधकामावर कारवाई करून बांधकाम पाडुन टाकु.

मला लोकसेवक श्री पवार यांना लाच दयावयाची इच्छा नसल्याने दि. ३०/०९/२०२१ रोजी १०:०० वाजता मी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, वरळी मुंबई येथे तक्रार देण्यासाठी आलो. सदरवेळी तेथील वरिष्ठांनी माझे तक्रारीच्या अनुषंगाने कारवाईकरिता पो नि कोरडे यांची नेमणुक केली. पो नि कोरडे यांनी माझे तक्रारीबाबत माझेकडे चौकशी करून तक्रारीच्या अनुषंगाने लेखी अर्ज करण्याबाबत सांगितले. परंतु मला व्यवस्थित लिहीता यत नसल्याने पो नि कोरडे यांनी माझे सांगणेप्रमाणे मराठीत टंकलिखीत केला व मला तो मराठीत वाचुन हिंदीत समजावुन सांगितला त्यानंतर मी त्यावर सही केली. तसेच पोनि कोरडे यांनी दोन शासकीय पंचांना पाचारण करून त्यांची ओळख १) श्री राम ज्ञानोबाराव गव्हाणे २) श्री संजय दिनकर सानप अशी करून दिली. त्यावर पोनि कोरडे यांनी पंचांना थोडक्यात हकिकत सांगून तक्रार अर्ज पंचांना वाचण्यास दिला. पोनि कोरडे यांचे सुचनेवरून सदरच्या तक्रार अर्जावर दोन शासकीय पंचांनी स्वाक्षरी करून पो.नि कोरडे यांनी स्वतः स्वाक्षरी करून तक्रार अर्ज स्वतःचे ताब्यात ठेवला.

त्यानंतर पो.नि. कोरडे यांनी मला मी दिलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने पंचासमक्ष पडताळणी कारवाई करण्यात येणार असल्याचे सांगितले. व पडताळणीला जाताना माझे बनियनला व्हॉईस रेकॉर्डर लावुन माझेसोबत पंच क्रमांक १ म्हणुन राम गव्हाणे हे येणार असल्याचे असल्याचे सांगितले. त्याप्रमाणे लोकसेवक यांना त्यांच्या कार्यालयात अथवा ते सांगतील तेथे जावुन भेटण्याचे ठरले. पडताळणी कारवाईसाठी जाताना शासकीय वाहनाचा संशय येवु नये म्हणुन खाजगी वाहने वापरत असल्याचे पो नि कोरडे यांनी सांगितले.

त्यानंतर पोनि. कोरडे यांनी मला तसेच दोन्ही पंचाना डिजीटल व्हॉईस रेकॉर्डरबाबत माहीती समजावुन सांगितली तसेच त्यामध्ये त्यांचे स्वतः चे , दोन्ही पंचाचे तसेच माझे निवेदन ध्वनीमुद्रीत केले. त्यानंतर लोकसेवक बसत असलेल्या कार्यालयाचे जवळ जावुन लोकमान्य टिळक रोडवर सी पी ऑफीस जवळुन पडताळणी कामी मला व पंच क्रं. १ यांना पाठवत असल्याचे पो.नि. कोरडे यांनी सांगितले.

त्याप्रमाणे मी व पंच क्र. १ श्री राम गव्हाणे असे माझे खाजगी मोटारसायकल क्रमांक एम एच ०१ सी एफ ५९०१ वरून तसेच खाजगी वाहन क्रमांक एम एच १२ पी एच ४३८३ या वाहनातुन पो नि घोडके,

पो नि कोरडे, पो ह २८५०५/सावंत, पो ना ०४०३२१/यादव व पंच क्रमांक २ श्री संजय सानप असे जाण्याचे ठरले. त्याप्रमाणे लाप्रवि कार्यालयातुन १३:०० वा. च्या सुमारास सापळा कारवाईकामी लागणारे साहीत्यासह पुढे सापळा पथकातील अधिकारी व कर्मचारी बसलेले खाजगी वाहन व त्यापाठोपाठ मी पंच क्रं. १ सह असे वरळी दुग्ध डेअरी मार्गे, हाजी अली सर्कलवरून, ताडदेव जंक्शनमार्गे, सोफीया जुबेर रोड, जे जे ब्रिजवरून, लोकमान्य टिळक रोडवरिल पोलीस आयुक्त, मुंबई शहर यांचे कार्यालयाच्या जवळ असलेल्या एचडीएफसी एटीएम समोर येवुन रस्त्याचे कडेला थांबलो. सदर ठिकाणाहुन पडताळणी कारवाई जाण्यापुर्वी लोकसेवक नक्की कोठे आहे याबाबत खात्री करण्यासाठी पो नि कोरडे यांचे सुचनेप्रमाणे मी माझे मोबाइल नंबर ९८६७८६६९५८ वरून लोकसेवक श्री पवार साहेब यांना त्यांचे मोबाईल क्रमांक ७४००३३५२९९ यावर फोन केला असता लोकसेवक यांनी मला त्यांच्या कार्यालयाच्या खाली भेटण्याबाबत सांगितले. त्यानंतर पोनि कोरडे यांनी माझे शर्टाच्या आतील बनियनला डिजीटल व्हाईस रेकॉर्डर चालू करुन लावला व पडताळणी कामी १४:४५ वा. रवाना केले. मी व पंच क्रमांक १ असे माझे मोटार सायकलवरून लोकसेवक श्री पवार यांच्या कार्यालयाच्या खाली गेलो व त्यांना फोन करून त्यांना भेटण्यासाठी ऑफीसच्या खाली आलो असल्याबाबत माहिती दिली. थोडयाच वेळात लोकसेवक श्री. पवार हे खाली आले त्यावेळी मी श्री पवार साहेब यांना म्हणालो की, '' कुछ कम करो यार, तुम पचास बोले थे ना '' त्यावर लोकसेवक श्री पवार साहेब म्हणाले की, '' पचास कर कम बोला मै भी.. दोस्ती के हिसाब से पचास बोला बहोत कम बोला, पाच कम कर बस, पैंतालीस'' सदरचे बोलणे झाल्यानंतर मी बोलतो असे बोलुन मी व पंच क्रमांक १ असे परत लोकमान्य टिळक रोडवरिल पथक थांबलेल्या ठिकाणी आलो.

पोनि कोरडे यांनी व्हाईस रेकॉर्डर काढून बंद करुन ताब्यात घेतले व झालेल्या संभाषणाची हकीकत विचारून व्हाईस रेकॉर्डरमधील संभाषण ऐकुन लोकसेवक श्री पवार यांची पडताळणी दरम्यान ४५,०००/– रु लाचेची मागणी केली असल्याचे निष्पन्न झाले. सापळा कारवाईकरिता लागणारी एवढी लाचेची रक्कम माझेकडे नसुन फक्त १०,०००/– रु. असल्याचे मी पोनि. कोरडे यांना सांगितले. त्यामुळे सापळा कारवाई करीता काही रक्कम ही खेळण्यातील नोटा वापरण्याचे सर्वानुमते ठरवण्यात आले. त्यामुळे आम्ही सर्वजण परत लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, वरळी, मुंबई या कार्यालयात आलो.

त्यांनतर लोकसेवक पवार यांनी माझ्याकडे मागणी केलेली लाचेची रक्कम रु. ४५,०००/– माझ्याकडे नसल्याने, मी माझ्याकडील स्वत:चे बचतीतील रु. १०,०००/– ( रु. ५००/– दराच्या भारतीय चलनाच्या २० नोटा एकुण रु. १०,०००/– ) पो.नि. कोरडे यांचेकडे दिल्या. पो.नि. कोरडे यांनी त्यांचेकडे रू. ५००/– दराच्या खेळण्यातील ७० नोटा रु. ३५,०००/– असल्याचे सांगुन ते लाचेकरीता वापरण्यात येणार असल्याचे सांगितले. पो.नि. कोरडे यांनी लोकसेवक पवार यांनी लाचेची रक्कम स्विकारल्यानंतर मी माझे नाकावरील मास्क डाव्या हाताने काढुन सदरचा मास्क पॅटचे डावे खिशात ठेवावा असा पुर्वनियोजीत इशारा करावा असे सांगितले. त्यावेळी सापळा पथक हे कोणास संशय येणार नाही असे आजुबाजुस थांबून पुर्वनियोजीत इशारा मिळताच लोकसेवक यांस रंगेहात पकडतील असे सांगितले.

त्यानंतर पो.नि. कोरडे यांचे सुचनेप्रमाणे सापळा पथकातील पोलीस अंमलदार पोना. कावले यांनी मला तसेच दोन्ही पंचाना अॅन्थ्रासिन पावडर व अॅल्ट्राव्हायलेट लॅम्प बाबत माहीती समजावुन सांगुन सापळा कारवाईतील त्याचे महत्व समजावुन सांगुन त्याचे प्रात्यक्षिक करुन दाखविले. तसेच लाच म्हणुन दयावयाच्या १०,०००/– रु. भारतीय चलनातील ५००/– रु दराच्या २० नोटा व खेळण्यातील ५००/– रु. दराच्या ७० खोटया नोटा असे एकुण ४५,०००/– रु. यास अॅन्थ्रासिन पावडर लावुन सदरच्या नोटा माझे पॅटच्या उजवे खिशात ठेवल्या.

समक्ष

(उमेश कोरडे)
पोलीस निरीक्षक
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई

त्यावेळी पोनि. कोरडे यांनी मला सुचना दिल्या की, लोकसेवकाला पैसे देण्याची वेळ येत नाही तोपर्यंत त्या नोटांना हात लावु नये. तसेच लाच रक्कम काढुन देताना उजवे हाताने काढुन देणे.

त्यानंतर मी दोन पंच व सापळा पथकातील पो. अधिकारी व कर्मचारी असे वर नमुद वेगवेगळया खाजगी वाहनाने पोलीस जिमखाना, मरीन ड्राईव्ह, मुंबई येथे आलो. सदर ठिकाणी पोनि. कोरडे यांचे सुचनेप्रमाणे लोकसेवक पवार यास त्याने मोबाईल क्रमांक ७४०००३३५२९९ वर संपर्क केला असता त्यांनी माझा फोन उचलला नाही परंतु लगेचच मला ७०३९५८८५४२ या क्रमांकावरून फोन आला असता मी सदर फोनवर बोललो असता सदरचा फोन श्री पवार यांचा असल्याचे सांगितले असता पो नि कोरडे यांनी व्हॉईस रेकॉर्डर चालु करुन त्यामध्ये रेकॉर्ड केला. त्यावेळी झालेल्या संभाषणा दरम्यान मी श्री पवार यांना भेटण्याकरिता आलो असल्याचे सांगुन कोठे भेटण्यास येवु असे विचारले असता त्यांनी सीपी टॅंक रोडवरिल स्वरुप बारजवळील चहाच्या टपरीवर येण्याबाबत त्याने मला सांगितले. त्यानंतर पोनि. घोडके यांचे सुचनेप्रमाणे पो नि कोरडे यांनी सापळा पथकातील अंमलदार यांना सदर ठिकाणी सापळा लावण्याकरिता सुचना दिल्या. त्यानंतर पोनि. कोरडे यांनी डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर चालु करुन माझे बनियनच्या आतील बाजुस लावुन दिले.

सदर ठिकाणाहुन व मी व पंच क्र. १ असे माझे मोटार सायकलवरुन सी पी टॅंक रोडवरील स्वरुप बारजवळील चहाच्या टपरीजवळ येउन थांबलो. पंच क्रमांक १ हे माझेपासुन थोडया अंतरावर उभे राहीले. व सापळा पथकातील अधिकारी व कर्मचारी यांनी सदर ठिकाणी सापळा लावुन आजूबाजुला थांबुन राहीले. मी लोकसेवक श्री पवार यांना फोन करून मी त्यांनी सांगितलेल्या ठिकाणी पोचलो असल्याचे सांगितले. त्यानंतर थोडया वेळाने लोकसेवक हे त्यांच्या मोटारसायकल वरून तेथे आले व माझेकडे लाचेच्या रक्कमेची मागणी केली त्यावेळी मी त्यांना चहा घेवु या असे सांगितले असता त्यांनी त्यास होकार दिला. त्यांच्याशी बोलणे चालु असताना मी माझे उजवे हाताने पॅंटच्या खिशात ठेवलेली लाच रक्कम लोकसेवक पवार यांना दिली ती त्यांनी डाव्या हाताने घेउन उजव्या हातात घेतली व पॅंटच्या उजवे खिशात ठेवली त्यावेळी लोकसेवक श्री पवार साहेब म्हणाले की, " कितना हजार पचास ना" त्यावर मी म्हणालो की, " पैतालीस है ना, पैतालीस हजार होताय" त्यावर लोकसेवक म्हणाले की " चल ठिक है, अभी ये किधर बोलने का नही, डर लगता है " त्यावर मी म्हणालो की, " अरे कुछ नही गिनो ना बिनधास्त यार " असे म्हणत मी लोकसेवक पवार यांनी लाचेची रक्कम स्विकारल्याबाबत मी माझा नाकावरिल मास्क डाव्या हाताने काढुन तो पॅंटच्या डावे खिशात ठेवुन सापळा पथकास पुर्वनियोजीत इशारा केला. त्यावेळी सापळा पथकाने तात्काळ लोकसेवक श्री पवार यास लाचेच्या रक्कमेसह रंगेहात पकडुन ताब्यात घेतले. त्यावेळी पोनि. घोडके यांनी तसेच पोनि. कोरडे यांनी त्यास त्यांची ओळख सांगुन कारवाईबाबत माहीती दिली. पडताळणी कारवाई, सापळा कारवाई बाबत पोनि. कोरडे यांनी सविस्तर पंचनामा केला आहे.

लोकसेवक पवार यांनी मी देखभाल करित असलेल्या जमातच्या दोन मजली बिल्डींगच्या टेरेसवरिल पत्र्याचे शेडचे बांधकाम अनधिकृत असल्याचे सांगुन त्याच्यावर निष्कासनाची कारवाई टाळण्याकरिता मदत करतो असे सांगुन तडजोडीअंती रक्कम रु. ४५,०००/- इतकी स्वत:करिता लाचेची मागणी करून व नमुद लाचेची रक्कम स्विकारली म्हणुन माझी लोकसेवक श्री. पवार यांचेविरूध्द कायदेशीर तक्रार आहे

माझे, लोकसेवक श्री पवार यांचेशी कोणतेही पुर्ववैमनस्य अथवा आर्थिक देवाणघेवाणीचे व्यवहार नाहीत.

माझी वरील फिर्याद संगणकावर मराठीत टंकलिखीत केली असून ती मला वाचुन दाखवुन हिंदीत समजावुन सांगितली ती माझे सांगण्याप्रमाणे बरोबर व खरी आहे.

समक्ष

(उमेश कोरडे)
पोलीस निरीक्षक
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई

8. तक्रारदाराने / फिर्यादीने तक्रार करण्याकरिता झालेल्या विलंबाची कारणे ........ तात्काळ

Reasons for delay in reporting by the Complainant / Informant

9. चोरीस गेलेल्या/अंतर्भूत मालमत्तेचा तपशील (आवश्यकतेनुसार नमुना फॉर्म जोडावा) सविस्तर मजकूर पाठीमागे लिहावे.

Particulars of properties stolen and involved (Attach necessary Proforma) write down details on blank back page.

..................................................

10. (a) चोरीस गेलेल्या / अंतर्भूत मालमत्तेचे एकूण मूल्य ..................

Total Value of properties stolen / involved

(b) चोरीची मिळालेली मालमत्ता (Recovered Properties)

11. अकस्मात मृत्यू / अपघाती मृत्यू असल्यास त्याचा क्रमांक ..................

Unnatural / Accidental Death Case No., if any

12. पहिल्या खबरीची थोडक्यात हकिगत (आवश्यक असल्यास स्वतंत्र कागद जोडावा) सविस्तर पाठीमागील कोऱ्या पानावर लिहावे.

First Information brief contents (Attach separate sheet, if required) : Detail write down back blank page.

नमुद तारीख वेळी व ठिकाणी यातील आलोसे कृष्णा मारुती पवार, नोकरी - इमारत मुकादम, बृ.म.न.पा./सी वार्ड, मुंबई यांनी फिर्यादी यांच्या इस्मारत करी रोड येथील जमातीच्या जागेवर दोन मजली बांधकामाच्या टेरेसवर असलेल्या पत्र्याच्या शेडवर कारवाई न करण्याकरीता ५०,०००/- रु. ची मागणी केली तसेच तडजोडअंती ४५,०००/- रु. स्वीकारण्याची तयारी दर्शविली व लाचेची रक्कम कोणत्याही कायदेशीर परिश्रमा खेरीज स्वतःच्या फायद्याकरीता रु. ४५०००/- स्वीकारले म्हणून आलोसेवर कलम ७ भ्र.प्र.अधि. १९८८ अन्वये गुन्हा नोंद.

13. **केलेली कार्यवाही** – 1. वरील फिर्यादीवरून कॉलम नं. 2 मधील कलमाप्रमाणे गुन्हा दाखल करून तपासावर घेतला, तपास करण्याचे आदेश दिले त्या तपासिक अंमलदाराचे नाव व हुद्दा :

..................................................

2. तपास नाकारण्यात आला त्याचे कारण,

..................................................

3. दुसऱ्या पोलीस ठाण्याकडे वर्ग करण्यात आला. पोलीस स्टेशन .................., जिल्हा .................., राज्य ..................

Action taken : Since the above information reveals Commission of offence (s) u/s as mentioned at Item No. 2 :

(1) Registered the case and took up the Investigation or Directed (Name of I.O.)................ Rank.............. No............... to take up the Investigation or

(2) Refused Investigation due to.................................... (3) Transferred to P. S. ..................................

District.............................................. on point of jurisdiction.

तक्रारदाराने / फिर्यादीने फिर्याद वाचून पाहिली. फिर्याद बरोबर लिहिली असल्याचे पाहून / वाचून / ऐकून बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले व त्याची एक प्रत त्यास विनामूल्य देण्यात आली.

F.I.R. read over to the Complainant / Informant, admitted to be correctly recorded and a copy given to the Complainant / Informant, free of cost.

(R.O.A.C.)

पोलीस ठाणे प्रभारी अधिकाऱ्याची सही.

Signature of Officer in-charge, Police Station

संपूर्ण नाव Name ...... उमेश कोरडे

पदनाम Rank ...... पोलीस निरीक्षक

तपासिक अं. चा कोड क्र. ..................

14. तक्रारदाराची सही व अंगठा

Signature and Thumb impression of the Complainant / Informant.

15. 1 न्यायालयास सादर केल्याची तारीख ०१/१०/२०२१.

1. Date and time of submitted to the Court.

Posting ला.प्र.वि., मुंबई.

Code No. of I. O. ..................

प्रत, 2. फिर्यादी, 3. पोलीस अधीक्षक (संगणक), 4. तपासिक अंमलदार, 5. स्थळ प्रत.

Copy to 2. Complainant, 3. Supdt. of Police (Computer), 4. Inv. Officer, 5. Office Copy.

Attachment to item 7 of **First Information Report**